पुणे महानगरपालिका
विधी समिती
तहकूब सभा परिपत्र

विधी समितीची (**गुरूवार,दि. १५ /७ /२०१०** रोजी तहकूब केलेली) सभा शुक्रवार, दि. २०/८ /१० रोजी दुपारी ३ : २५ (तीन पंचवीस) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रं.७ वरील खालील विषयाचा विचार होईल.

विषय क्रं.२६

क्षेत्रिय अधिकारी (इमाव गट) (वर्ग – १) (वे.श्रे.रू.१५६०० /– ते ३९१००/– + ८१००/– (ग्रेड पे) + मान्य भत्ते) या पदावरील हंगामी नेमणूकीबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ / उआ /से /१५५, १७/६/२०१० चे पत्र.

विषय क्रं.२७

ज्युनिअर ग्रेड लेखनिक वर्ग – ३ (वेतनश्रेणी रू.५२०० ते २०२०० + ग्रेड पे २९०० + मान्य भत्ते) पदासाठी तयार करावयाचे निवडयादी /प्रतिक्षायादीबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/६६, दि. ७/५/२०१० चे पत्र.

विषय क्रं. २८

नागरिकांसाठी भेटीची वेळ निश्चित करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ /उआ (से)/०९ दि. ३/४/२०१० चे पत्र.

(टीप : विषय क्र.२६ ते २८ चा विचार पुढील सभेत करावा,असे दि. ८/७/२०१० चे सभेत ठरले आहे.)

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

पुणे महानगरपालिका

विधी समिती

कार्यपत्रिका क्र. ८

विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दि. २० /०८ /१० रोजी दुपारी ३ : ३० (साडे तीन)

वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

विषय क्र. २९

मा.अरूण धिमधिमे व मा.विरेंद्र किराड यांचे दि. १०/०८ /१० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील कर आकारणी व कर संकलन प्रमुख (वर्ग – १) चे पद महत्वाचे पद असून या पदावर आत्तापर्यंत पुणे महानगरपालिकेतीलच अनुभव व शैक्षणिक पात्रता असणाऱ्या सेवकाची नियुक्ती करण्यांत आली आहे. या पदासाठी सद्या असणारी पात्रता लक्षात घेऊन प्रशासनाने वेळोवेळी जाहीरात देऊन अर्ज मागविले होते. परंतु पात्रता धारण करणारी व्यक्ती उपलब्ध होऊ शकली नाही. तरी कर आकारणी व कर संकलन प्रमुख (वर्ग – १) या पदाच्या पात्रतेमध्ये खालील प्रमाणे बदल करावा व दिनांक १८/ ७/२००९ रोजी देण्यात आलेली जाहीरात रद्द करून नव्याने अर्ज मागविण्यात यावेत.

सद्या असणारी पात्रता –

१ सिव्हील इंजिनिअरिंग पदवी किंवा तत्सम शैक्षणिक पात्रता धारण केलेली पाहीजे.

२ कायद्याच्या पदवीसह (कला) साहित्य किंवा विज्ञान, वाणिज्य शाखेतील पदवी धारण केलेली असली पाहिजे अथवा

३ व्हॅल्युशन किंवा जनरल सेक्शन्स (परिक्षेत) याबाबत रॉयल इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड सर्व्हेअर्स, लंडन या संस्थेची असोसिएट मेंबरशिप किंवा फेलोशिप धारण केलेली असली पाहिजे. वरील शैक्षणिक पात्रता धारण केल्यानंतर उमेदवारास कमीत कमी १० वर्षाचा शासकीय कामांचा अनुभव असली पाहीजे व या १० वर्षापैंकी ३ वर्षाचा अनुभव स्थावर मालमत्तेची किंमत ठरविण्याबाबतचा /स्थावर मालमत्तेच्या कर आकारणीबाबतचा असला पाहिजे.

सुधारित पात्रता –

१ कोणत्याही शाखेचा मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर

२ सि.ग्रे.लेखनिक अगर तत्सम पदावरील कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील किमान १२ वर्ष कामाचा अनुभव

३ मिळकत कर विषयात विशेष शैक्षणिक पात्रता व प्राविण्य असल्यास प्राधान्य

नगरसचिव,

पुणे महानगरपालिका.